# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** कवठेमहांकाळ
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0026  **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/01/2026 00:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 21/01/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/01/2026
**Time From (वेळेपासून):** 10:49 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/01/2026  **Time (वेळ):** 00:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/01/2026 00:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती यास्मीन इनामदार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्श,कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्श,कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9527904700

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुभाष बाबासाहेब पाटील | | | 1. इरळी,कवठेमहांकाळ,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि. 22.01.2026

मी श्रीमती यास्मीन इनामदार, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न.9527904700.

सरकारतर्फे फिर्यादी होवून देते फिर्यादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 20/01/2026 रोजी 14.42 वा चे सुमारास तक्रारदार श्री. दत्तात्रय कुंडलिक डुबुले, वय- 61 वर्षे, रा. देशिंग, ता.कवठेमहांकाळ जि.सांगली यांनी त्यांचा मित्र किरण जगताप यांचे मो.क्र.8600482098 वरून आम्हास संपर्क करून त्यांची तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथील पंचायत समिती निवडणुकीचा नामनिर्देशन फॉर्म देणेसाठी प्रत्येक फॉर्मचे 100/- रूपये प्रमाणे लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार कळविली. त्यावेळी मी तक्रारदार डुबुले यांना दि.21.01.2026 रोजी सकाळी 10.00 वाजता पथकासह मोरगाव गावाजवळ येत असलेचे सांगून संपर्क केल्यानंतर हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी लागलीच मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, विभागीय कार्यालय सांगली शहर यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विनंती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना दि.21/01/2026 रोजी सकाळी 08.30 वाजता एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि. 21/01/2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच सकाळी 08.45 वा चे सुमारास एसीबी कार्यालयात आमचे समक्ष हजर झालेत. त्यानंतर मी दोन्ही पंचांना एक लोकसेवकाविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील, पोशि/चंद्रकात जाधव, चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अॅथ्रासिन पावडर, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय बोलेरो वाहन क्र. एमएच 10 डीक्यु 9530 मधून कार्यालयातून 09.00 वा चे सुमारास रवाना होवून स्टेशन चौक, एमआयडीसी कुपवाड तानंग फाटा, सोलापूर हायवे मार्गे, भोसे, देशिंग खरशिंग मार्गे मोरगाव गावजवळील अग्रणी नदीचे बाजुस सुरक्षित ठिकाणी 09.50 वा चे सुमारास दाखल झालो. त्यावेळी मी तक्रारदार यांचा मित्र किरण जगताप यांना फोन करून तक्रारदार डुबुले यांना आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तक्रारदार श्री. डुबुले हे त्यांचेकडील पॅशन प्लस मो.सा. एमएच 12 एफबी 3950 वरून व किरण जगताप हे त्यांचेकडील मो.सा. वरून आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. डुबुले यांना आमचेकडील शासकीय वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील शासकीय वाहनामध्ये बसले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. डुबुले यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. अतुल अशोक कांबळे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री.जितेंद्र श्रीपती वडगावे यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. डुबुले यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये पंचायत समिती निवडणुकीचा नामनिर्देशन फॉर्म देणेसाठी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथील नामनिर्देशन फॉर्म देणारे संबंधीत टेबलचे कर्मचारी हे प्रत्येक फॉर्मचे 100/- रूपये प्रमाणे पैसे घेत असून सदर रक्कमेची कोणतीही



Scanned with OKEN Scanner

शासकीय पावती देत नाहीत अगर तो रक्कमेची नोंद देखील कोणत्याही रजिष्टरला घेत नसून सदरची रक्कम बेकायदेशीररित्या लाच स्वरूपात स्विकारीत असलेबाबतची हकीकत सांगितली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. डुबुले यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. डुबुले यांनी त्यांचे साबेत आणलेला लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये "मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासोबत राहणेस आहे. मी माझी पत्नी कांचन दत्तात्रय डुबुले हिचे नावे पंचायत समिती निवडणुकीचा नामनिर्देशन फॉर्म भरणार होतो. त्याकरीता मी दि.20.01.2026 रोजी पंचायत समिती निवडणुकीचा नामनिर्देशन फॉर्मचे चौकशीकरीता तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे गेलो होतो. त्यावेळी तेथील नामनिर्देशन फॉर्म देणारे कर्मचारी यांनी प्रत्येक फॉर्मचे 100/- रूपये प्रमाणे पैसे घेत असल्याचे सांगितले होते. त्यावेळी मी सदर कर्मचारी यास 100/- रूपये रक्कमेच्या पावतीबाबत विचारणा केली असता अशी कोणतीही पावती दिली जात नसल्याचे त्यांनी सांगितले होते. तसेच सदर कर्मचारी हे प्रत्येक उमेदवार यांचेकडून प्रत्येक नामनिर्देशन फॉर्मचे 100/- रूपये प्रमाणे पैसे घेवून त्याची कोणतीही शासकीय पावती देत नव्हता, व सदर रक्कमेची नोंद देखील कोणत्याही रजिष्टरला घेत नव्हता. त्यामुळे सदर कर्मचारी हा उमेदवारांना नामनिर्देशन फॉर्म देणेकरीता प्रत्येक फॉर्मला 100/- रूपये प्रमाणे रक्कम ही कोणतीही कायदेशीर पावती न देता बेकायदेशीररित्या लाच स्वरूपात स्विकारत असल्याची माझी खात्री झाली आहे.

आज दि.21.01.2026 रोजी मी पंचायत समिती निवडणुकीचा माझ्या पत्नीचे नावे 2 नामनिर्देशन फॉर्म घेणेसाठी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे जाणार आहे. त्यावेळी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथील नामनिर्देशन फॉर्म देणारे संबंधीत कर्मचारी हे माझ्याकडे माझ्या पत्नीच्या नावे 2 नामनिर्देशन फॉर्म देणेकरीता प्रत्येक नामनिर्देशन फॉर्मचे 100/- रूपये प्रमाणे 200/- रूपये लाचेची मागणी करतील याची मला खात्री आहे. मला त्या कर्मचारी यांना लाच देण्याची इच्छा नाही. तरी त्यांचेविरूध्द योग्य ती कारवाई व्हावी.

माझेत व तहसिल कार्यालयातील संबंधीत निवडणुक टेबलवरील फॉर्म देणारे कर्मचारी यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार नाही तसेच आमचेत कोणताही भांडण तंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती.." अशी हकीकत अर्जामध्ये नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. डुबुले यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.
त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथील निवडणुक नामनिर्देशन फॉर्म देणारे लोकसेवक यांचेविरुध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. डुबुले व पंच क्र.1 अतुल कांबळे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी 10.25 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 10.49 वा सुरु करुन तक्रारदार श्री. डुबुले यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून तक्रारदार व पंच नं.1 कांबळे यांना तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. डुबुले हे त्यांचेकडील पॅशन प्लस मो.सा. एमएच 12 एफबी 3950 वरून पंच नं.1 कांबळे यांचेसह रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. डुबुले व पंच नं.1 कांबळे असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 11.17 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. कांबळे यांना, लोकसेवक यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे दाखल झालो. त्यावेळी कार्यालयाचे पोर्चमध्ये टेबलचे पाठीमागे बसले इसमाजवळ तक्रारदार हे गेले. त्यावेळी सदर कर्मचारी यांचे गळयामध्ये असले आयकार्डवर सुभाष पाटील असे नाव होते. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक पाटील यांना पंचायत समिती निवडणुकीचा नामनिर्देशन फॉर्मची मागणी केली. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना त्यांचे संपुर्ण नाव, राहणार कोणाचे नावे अर्ज भरणार आहे वगैरे माहिती विचारली त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना सर्व माहिती सांगितली. त्यानंतर लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना किती फॉर्म लागणार आहेत असे विचारले असता



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार यांनी दोन फॉर्मची मागणी करून "फॉर्मची काय किंमत" असे विचारले असता लोकसेवक पाटील यांनी "शंभर" असे म्हणून तक्रारदार यांचा मोबाईल नंबर विचारून 2 नामनिर्देशन फॉर्म देवून "हे दोनशे रुपये द्या" असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना "हयाची काय पावती वगैरे.....जोडायला लागत्या काय त्याला" विचारले असता लोकसेवक पाटील यांनी "न्हाय..न्हाय.." असे म्हणून पावती देत नसल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांना "एक मिनीट साहेब" असे म्हणून नामनिर्देशन फॉर्म न घेता तक्रारदार व मी असे तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. डुबुले यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.1 कांबळे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी आजरोजी नामनिर्देशन फॉर्म देणेसाठी हजर असलेले लोकसेवक पाटील हे दि.20.01.2026 रोजी देखील तेच नामनिर्देशन फॉर्म देणेसाठी हजर होते अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. डुबुले व लोकसेवक यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाई मध्ये, कवठेमकहांकाळ तहसिल कार्यालय येथील पंचायत समिती निवडणुकीचा नामनिर्देशन फॉर्म देणारे लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे पत्नीचे नावे 2 नामनिर्देशन फॉर्म देण्यासाठी प्रत्येक फॉर्मचे 100/- रूपये प्रमाणे 200/- रूपये लाचेची मागणी करून सदर रक्कमेची पावती देण्यास नकार दिला असल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान 11.25 वा चे सुमारास तक्रारदार यांना त्यांचे मोबाईलवर 7498006707 या अनोळखी नंबरवरून फोन आला असता त्यांनी सदरचा कॉल स्विकारला असता समोरील व्यक्तीने तक्रारदार यांना नामनिर्देशन फॉर्म घेवून जाण्यास सांगून त्याचे टायमिंग 12.00 वा पर्यंत असल्याचे सांगितले असलेबाबत तसेच सदरचा आवाज हा नामनिर्देशन फॉर्म देणारे कर्मचारी पाटील यांचाच होता अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना फॉर्म घेण्यासाठी बोलविले असल्याने लागलीच लोकसेवक पाटील यांचेविरूध्द तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. डुबले यांना लोकसेवक पाटील लाच मागणी केलेप्रमाणे 200/- रूपये रक्कम हजर करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचेकडील 100/- रूपये दराच्या एकुण 2 नोटा असे 200/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यावेळी मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी लाच रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतल्या. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉ रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोशि/चंद्रकात जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन 200/- रूपयांचा नोटांची घडी करून तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. डुबुले, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी पथकातील पोशि/जाधव यांना मोरगाव जवळील अग्रणी नदीचे बाजुस थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.

त्यानंतर मी 13.10 वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये व सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले आहे.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री.पाटील यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर कार्यालयाचे बाहेर येवून हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.25 वाजता सुरू करून लेसचे सहाय्याने तक्रारदार यांचे गळयात अडकवला. त्यानंतर मी, तक्रारदार व पंच नं. 1 कांबळे यांना लोकसेवक पाटील यांची भेट घेण्याकरीता रवाना



Scanned with OKEN Scanner

होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. डुबुले व पंच नं. 1 श्री. कांबळे असे तक्रारदार यांचेकडील मो.सा. वरून रवाना झाले.

त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 श्री. वडगावे, पोना/प्रितम चौगुले, पोशि/अजित पाटील, चालक रजपूत असे लॅपटॉप, पिं्रटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो एम एच 10 डी क्यु 9530 मधून रवाना झालो.

मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/680 चंद्रकांत जाधव हे मोरगाव अग्रणी नदीचे बाजूस सुटकेससहीत थांबून राहीले. तक्रारदार श्री. डुबुले पंच नं. 1 श्री. कांबळे हे मो.सा. वरून पुढे आणि मी व सापळा पथक असे शासकीय वाहन बोलेरोने त्यांचे पाठोपाठ रवाना झालो. तक्रारदार यांनी त्यांची मो.सा. कवठेमहांकाळ गावामधून तहसिल कार्यालयाचे कंपाऊंडचे बाहेर मेनरोडलगत मो.सा.पार्क केली. मी दिले सुचनेवरुन चालक पोशि/विठठल रजपुत यांनी आमचेकडील शासकीय बोलेरो वाहन हे तक्रारदार व पंच थांबले ठिकाणापासुन काही अंतरावर थांबवली. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 असे तहसिल कार्यालयामध्ये चालत गेलेचे दिसले. लागलीच मी व सापळा पथक असे वाहनामधून उतरून तक्रारदार व पंच नं.1 यांचे पाठोपाठ जावून आजु-बाजुस सापळा लावून थांबून राहिलो. त्यावेळी तक्रारदार हे कार्यालयाचे गेट जवळ गेले असता तेथील पोलीस कर्मचारी यांनी तक्रारदार यांना आतमध्ये सोडले नाही. त्यावेळी तक्रारदार यांनी बाजुस येवून कोणास तरी फोन केला व त्यानंतर तक्रारदार हे कार्यालयाचे गेटजवळ गेले त्यावेळी गेटजवळ एक अनोळखी कर्मचारी आला व त्याने तक्रारदार यांना गेटच्या आतमध्ये घेतले. त्यावेळी पंच नं.1 कांबळे हे देखील त्यांचे पाठोपाठ गेले.

त्यानंतर आम्ही गेटच्या बाहेर थांबून राहिलो. काही वेळात तक्रारदार हे कार्यालयाचे गेटच्या बाहेर आले व त्यांनी हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला.

लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे पोना/चौगुले यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.44 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या. लागलीच मी व सापळा पथक तहसिल कार्यालयामध्ये जावून पोर्चमध्ये थांबले पंच नं.1 कांबळे यांचेजवळ गेलो. त्यावेळी पंच नं.1 कांबळे यांनी तहसिल कार्यालयाचे पोर्चमध्ये टेबलचे पाठीमागे बसले इसम हे लोकसेवक पाटील असून त्यांनी तक्रारदार यांचेकडे लाच रक्कम स्विकारून त्यांचे शर्टचे समोरील डावे बाजुस असले खिश्यामध्ये ठेवली असल्याचे सांगितले.

त्यानंतर लागलीच माझे सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले. त्यावेळी मी लोकसेवक पाटील यांना माझी ओळख सांगितले. तसेच मी दिले सुचनेप्रमाणे पोना/चौगुले यांनी लोकसेवक पाटील यांचे हात मनगटाजवळ घट्ट पकडले. त्यानंतर तहसिल कार्यालयामध्ये निवडणुकीचा अर्ज भरणेसाठी गर्दी असलेने सुरक्षितेचे कारणास्तव आम्ही लोकसेवक पाटील यांना ताबेत घेवून तहसिल कार्यालयाचे समोर असले दुय्यम निबंधक कार्यालयामधील एका रिकाम्या खोलीमध्ये घेवून गेलो.

त्यानंतर मी लोकसेवक पाटील यांना तक्रारदार डुबुले यांचेकडून स्विकारले 200/- रूपये लाच रक्कमेबाबत विचारणा्ी केली असता त्यांनी 100/-रूपये दराचे 2 नोटा त्यांचे शर्टचे समोरील डावे बाजुचे खिश्यामधून बाहेर काढली. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 वडगावे यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे ताबेत घेवून रक्कमेची पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळा कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्री. वडगावे यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली. त्यानंतर मी लोकसेवक श्री. पाटील यांना माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.

त्यानंतर लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या हया दुय्यम निबंधक कार्यालय कवठेमहांकाळ येथील एका रिकाम्या खोलीमध्ये पुर्ण केल्या आहेत. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर मी लोकसेवक श्री पाटील यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. सुभाष बाबासाहेब पाटील, वय -54 वर्षे, व्यवसाय - नोकरी महसुल सहाय्यक, वर्ग-3 तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ, रा. मु.पो.इरळी ता.कवठेमहांकाळ जि.सांगली मो.क्र. 7498006707 असे असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही लोकसेवक यांचेकडील नामनिर्देशन फॉर्म नोंदीचे कच्चे रजिष्टर, कोरे नामनिर्देशन फॉर्म तसेच रिकामे पावती पुस्तक आम्ही ताबेत घेतले.

त्यानंतर आम्ही तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथून 15.20 वा चे सुमारास रवाना होवून शासकीय विश्रामगृह कवठेमहांकाळ येथे 15.30 वा चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं. 1 श्री. कांबळे यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1



Scanned with OKEN Scanner

यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मो.सा वरून मोरगाव येथून रवाना होवून तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे दाखल झालो. त्यावेळी कार्यालयाचे कंपाऊडचे बाहेर मेन रोडजवळ मो. सा. पार्क करून आम्ही आतमध्ये चालत गेलो. त्यावेळी तहसिल कार्यालयामध्ये गर्दी होती व कार्यालयाचे मेन गेटजवळ पोलीस कर्मचारी यांनी तक्रारदार यांना आतमध्ये सोडले नाही. त्यावेळी तक्रारदार यांनी बाजुस येवून लोकसेवक पाटील यांना फोन करून बाहेर फोन स्पिकरवर ठेवला. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक यांना कागदपत्रे घेवून आले असल्याचे सांगून अर्ज देता काय अशी विचारणा केली. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना आतमध्ये येण्यास सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना पोलीस कर्मचारी हे आतमध्ये सोडत नसल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक पाटील हे गेटजवळ आले व त्यांनी तक्रारदार यांना आतमध्ये घेतले. त्यावेळी मी देखील त्यांचे पाठोपाठ गेलो. त्यावेळी लोकसेवक पाटील हे त्यांचे टेबलजवळ गेले. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना "पैशे दया दोनशे रूपये" असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना "दोनशे रूपयाची तुम्ही मला काय पावती देताय" अशी विचारणा केली असता लोकसेवक पाटील यांनी "द्या की" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे पैशाची मागणी करून "पावती मिळत नाही याची.....कुणालाच दिलेली न्हाय ओ" असे म्हणून तक्रारदार यांना 2 नामनिर्देशन फॉर्म दिले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्यामध्ये अॅथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली 200/- रूपये लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने बाहेर काढून लोकसेवक पाटील यांचेसमोर धरली असता लोकसेवक पाटील यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून त्यांचे शर्टच्या समोरील डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली.

त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक पाटील यांना "आणी काय सही लागत्या काय" असे विचारले असता लोकसेवक पाटील यांनी "न्हाय न्हाय.... फॉर्म भरा आणी सबमीट करा ताबडतोब" असे म्हणालेने तक्रारदार डुबुले तेथून बाहेर आले व त्यांनी हातरुमालाने तोंड पूसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला" वगैरे हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. डुबुले यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.1 कांबळे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही शासकीय विश्रामगृह कवठेमहांकाळ येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 21.01.2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. सुभाष बाबासाहेब पाटील, महसुल सहाय्यक, वर्ग-3 तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ यांनी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचे पत्नीचे नावाचे 2 नामनिर्देशन फॉर्म देणेसाठी तक्रारदार यांचेकडे प्रत्येक फॉर्मचे 100/- रूपये प्रमाणे 2 नामनिर्देशन फॉर्मचे 200/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर लागलीच लोकसेवक सुभाष पाटील यांचेविरूध्द तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे सापळा कारवाई केली असता लोकसेवक सुभाष पाटील यांनी तक्रारदार यांना कोणत्याही प्रकारची कायदेशीर पावती न देता व घेत असलेल्या रक्कमेचा उल्लेख कोणत्याही रजिष्टरला न करता तक्रारदार यांचेकडून 200/- रूपये लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणुन माझी लोकसेवक श्री. सुभाष बाबासाहेब पाटील, वय -54 वर्ष, व्यवसाय - नोकरी महसुल सहाय्यक, वर्ग-3 तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ, रा. मु.पो. इरळी ता. कवठेमहांकळ जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pravinkumar devappaa kamble(I (Inspector)) / 15101000402ssmgm8202y **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

( ) **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**

( ) (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

( )

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
कवठेमहांकाळ पोलिस ठाणे
जि.सांगली.

( )

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): pravinkumar devapp

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 15101000402ssmgm82



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**



Scanned with OKEN Scanner